दै. देशोन्नती दि. 24.01.25

# रोहित्रामधील ऑईल चोरणारी टोळी जेरबंद

देशोन्नती वृत्तसंकलन



**नांदेड :** महावितरणच्या रोहित्रामधून ऑईल चोरणारी टोळी उस्माननगर पोलिसांनी जेरबंद केली असून त्यांच्याकडून १ लाख २ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

उस्माननगर ठाण्याचे सपोनि चंद्रकांत पवार व त्यांचे पथक २३ जानेवारी रोजी रात्री गोळेगाव ते शिराढोण मार्गावर पेट्रोलिंग करत असताना रोहित्रामधील ऑईल चोरी करण्याच्या उद्देशाने तेथे असलेले सय्यद हुसेन सय्यद सलीम रा. वाजेगाव, शेख नशीब शेख इब्राहीम रा. देगलुर नाका, सय्यद रज्जाक सय्यद हुसेन रा. वाजेगाव व लालू उर्फ राहुल गायकवाड रा. चौफाळा या चौघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून एक पाईप, लोखंडी पाईप, दोन लोखंडी चैन पाने, पाच रिकामे कॅन, एक ऑटो असा एकूण १ लाख २ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोउपनि गजानन गाडेकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उस्माननगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या पथकात पोहेकॉ राम टेकाळे, सुशील कुबडे, नामदेव रेजितवाड, अनिरुध्द वाडे, अप्पाराव यांचा समावेश होता.